आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७ ऑक्टोबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गुजरातमध्ये नव्या २१ मंत्र्यांचा शपथविधी, माजी गृहराज्यमंत्री हर्ष सिंघवी यांनी घेतली उपमुख्यमंत्री पदाची शपथ

- नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत लोकार्पण

- छत्तीसगडमध्ये २०८ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- एच१ बी विजासाठी १ लाख डॉलर्स शुल्क आकारण्याच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाला अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सकडून न्यायालयात आव्हान

**<><><><><>**

गुजरात सरकारच्या मंत्रिमंडळाचा आज विस्तार झाला. त्यात २१ नवीन मंत्र्यांनी शपथ घेतली. माजी गृहराज्यमंत्री हर्ष सिंघवी यांनी आज उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. आधीच्या मंत्रीमंडळात राज्यमंत्री असलेले प्रफुल्ल पानसेरिया यांना कॅबिनेट मंत्री पदी बढती मिळाली. क्रिकेटपटू रविंद्र जडेजा याची पत्नी रिवा बा यांनीही राज्यमंत्री पदाची शपथ घेतली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी गांधीनगरमध्ये आयोजित कार्यक्रमात नवीन मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित होते. या शपथविधीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण मंत्रीमंडळानं काल राजीनामा दिला होता.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराबाबत चर्चा करण्यासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज मुख्यमंत्री नितीश कुमार

यांची भेट घेतली. काल, शहा यांनी भाजपाचे वरिष्ठ नेते आणि निवडणूक समितीच्या सदस्यांबरोबर बैठक घेतली होती. मुख्यमंत्री पदावरच्या व्यक्तीबाबतचा निर्णय विधानसभा निवडणुकीनंतर निवडून आलेल्या आमदारांच्या बैठकीत घेतला जाईल, असं शहा यांनी यापूर्वीच स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं लोकार्पण आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत झालं. या विमानानं यावेळी आकाशात उड्डाण केलं. ओझरमधल्या हिंदुस्थान एअरोनॉटिक्सच्या कारखान्यात हा कार्यक्रम झाला. यावेळी त्यांनी तेजस एमके वन ए या लढाऊ विमानाच्या उत्पादन साखळीचंही लोकार्पण केलं. भारताला संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

**होल्ड - राजनाथ सिंग बाइट**

नाशिकमध्ये तयार झालेल्या सुखोई-३०, एलसीए आणि एचटीटी-४० विमानांच्या उड्डाणांचं राजनाथ सिंह यांनी कौतुक केलं. हे उड्डाण देशाच्या स्वावलंबनाचं उड्डाण असल्याचं ते यावेळी म्हणाले. २०१४ पूर्वी जवळपास ६५ ते ७० टक्के संरक्षण सामग्री आयात केली जात होती. मात्र आता जवळपास ६५ टक्के उत्पादनं देशात तयार होत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

हवाईदलातल्या सर्व अधिकारी - कर्मचाऱ्यांनी दर्जा, व्यावसायिकता, सुरक्षा आणि कार्यक्षमता यासाठी कायम वचनबद्ध रहावं. त्यातूनच देशाच्या हवाई रक्षणासाठी भारतीय हवाई दल प्रभावीरित्या कार्यरत राहू शकेल, असं हवाई दल प्रमुख ए. पी. सिंग यांनी आज सांगितलं. नागपुरात हवाई दलाच्या देखरेख विभागात आयोजित कमांडरांच्या परिषदेत ते बोलत होते. तांत्रिक क्षमतांचा देशांतर्गत विकास करणं या विषयावर ही दोन दिवसीय परिषद होती.

<><><><><>

डिजिटल अटक या सायबर गुन्ह्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत केंद्रीय अन्वेषण संस्थेकडून उत्तर मागितलं आहे. हरयाणातल्या अंबाला इथल्या एका ज्येष्ठ नागरिक महिलेच्या तक्रारीनंतर सर्वोच्च न्यायालयाने ही दखल घेतली आहे. सायबर चोरांनी सर्वोच्च न्यायालयाच्या बनावट आदेशांचा वापर करून त्यांना डिजिटल अटकेत ठेवलं आणि एक कोटींहून अधिक रुपये उकळल्याचा आरोप या महिलेने केला होता. बनावट आदेशांचा वापर करून अशा प्रकारे होणारी आर्थिक फसवणूक न्यायव्यवस्थेवरच्या नागरिकांच्या विश्वासाला धक्का देणारी ठरू शकते, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं आहे.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये आज २०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यामुळं जवळपास संपूर्ण अबूजमाड आता नक्षलवाद्यांच्या प्रभावातून मुक्त झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये ११० महिला आणि ९८ पुरुष आहे. त्यांनी १९ एके-४७ रायफली आणि १७ SLR रायफलींसह एकंदर १५३ शस्त्र पोलिसांकडे जमा केली.

<><><><><>

राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे आज अल्पशा आजाराने आकस्मिक निधन झाले. ते ६५ वर्षाचे होते. कर्डिले हे वर्षभरापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत राहुरी विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले होते.

<><><><><>

भारतात सध्या १२० कोटी मोबाइलधारक, ९७ कोटी इंटरनेट वापरकर्ते आणि ९४ कोटींहुन अधिक ब्रॉडबँड धारक असून भारत आता जगातला तिसऱ्या क्रमांकाचा डिजिटल देश झाला आहे, असं दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे

यांनी म्हटलं आहे. दूरसंचार विभागाच्या कामगिरीबद्दल नवीदिल्लीत घेतलेल्या एका वार्ताहर परिषदेत ते आज बोलत होते. जगभरातल्या एकूण डिजिटल व्यवहारांपैकी ४६ टक्के व्यवहार एकट्या भारतात होतात, असं ते म्हणाले. येत्या वर्षात सरकार वेगवान स्पीड पोस्ट सेवेचा प्रारंभ करणार असून त्याद्वारे टपाल फक्त  २४ तासात गंतव्य स्थानी पोचेल. देशभरातल्या टपाल कार्यालयात गेल्या एका वर्षात साडेतीन कोटींहून अधिक आधार दुरुस्त्या केल्या असून ८१ लाख हुन अधिक सुकन्या समृद्धी खाती उघडली आहेत अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><>**

शबरीमाला देवस्थानातून सोन्याची थाळी चोरी प्रकरणाची एसआयटी चौकशी सुरु आहे. एसआयटीने तपासादरम्यान आज एका संशयिताला ताब्यात घेतलं. केरळ उच्च न्यायालयात यासंबधी सुनावणी सुरु आहे. ताब्यात घेतलेल्या संशयिताला एसआयटी आज दुपारी न्यायालयात हजर करणार आहे.

**<><><><>**

अमेरिकेत उच्च कुशल परदेशी कामगारांसाठी नवीन H-1B व्हिसावर एक लाख डॉलर्स शुल्क आकारण्याच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाला अमेरिकेच्या चेंबर ऑफ कॉमर्सने न्यायालयात आव्हान दिलं आहे. या शुल्कामुळे H-1Bवर अवलंबून असलेल्या व्यवसायांना त्यांच्या कामगार खर्चात लक्षणीय वाढ करणं किंवा कौशल्य कमी असलेल्या कामगारांना कामावर ठेवणं यापैकी एकाची निवड करावी लागेल, असं चेंबर ऑफ कॉमर्सचं म्हणणं आहे. कॅलिफोर्निया इथल्या फेडरल न्यायालयात विविध संघटना आणि गटांकडून या निर्णयाला आव्हान दिलं जात आहे.

**<><><><>**

भारताची धोरणात्मक थिंक टँक म्हणून नीति आयोग बजावत असलेल्या भूमिकेची श्रीलंकेच्या प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली आहे. नवी दिल्ली इथे नीति

आयोगाला श्रीलंकेच्या प्रधानमंत्री हरिणी निरेखा अमरसुरिया यांनी काल भेट दिली. आयोगाचं कामकाज आणि प्रमाणाधारित धोरणनिर्मिती समजून घेण्यात त्यांनी स्वारस्य दाखवलं. अमरसुरिया यांनी श्रीलंकेचा सुधारणांचा प्रवासही यावेळी उलगडून सांगितला तसंच धोरण समन्वयासाठी नीति आयोगास संस्थांची गरज अधोरेखीत केली.

निती आयोगाचे संचालक सुमन बेरी यांनी यावेळी पीएम गतीशक्ती,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०यासारख्या महत्वाची धोरणे भारताने राबवल्याचं तसंच पर्यटन आणि सांस्कृतिक क्षेत्रात नवा उत्साह आणल्याचं सांगितलं. या भेटीदरम्यान भारत- श्रीलंका  द्विपक्षीय संबध, व्यापार, गुंतवणूक तसंच आर्थिक आणि तंत्रज्ञानातल्या सहकार्य कराराबद्दलचं सादरीकरण करण्यात आलं.

**<><><><><>**

आर्थिक सुधारणांच्या क्षेत्रात श्रीलंकेनं केलेल्या कामगिरीचं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं कौतुक केलं आहे. मोठ्या आर्थिक संकटाचा सामना केल्यानंतर आता त्यातून बाहेर पडण्याचा मार्गावर श्रीलंकेची सुरू असलेली वाटचाल ठाम असल्याचं नाणेनिधीनं म्हटलं आहे. गेल्या आर्थिक वर्षात श्रीलंकेचा आर्थिक वृद्धी दर ५ टक्के होता आणि चालू आर्थिक ४ पूर्णांक २ दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**